ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ पुणें, बुधवार तारीख २६ मार्च, १९५२ अंक १२

## विविध माहिती

**नॅशनल इन्स्ट्रुमेंटस फॅक्टरी**— भारतांत १८३० सालीं मॅथेमॅटिकल इन्स्ट्रुमेंटस ऑफिसची स्थापना करण्यांत आली होती. स्वातंत्र्योत्तर भारतीय सरकारनें त्याची पुनर्घटना करून त्याला वरील नांव दिलें. कारखान्याची उभारणी करण्यासाठी जरूर असलेली जागा कलकत्त्याजवळ जाधवपूर येथें सरकारनें आपल्या ताब्यांत घेतली आहे.

**धोक्याची सांखळी ओढण्याचे प्रकार**— बंगाल-नागपूर रेल्वे रस्त्यावर १९५१ च्या अखेरच्या तिमाहींत डब्यांतील धोक्याची सांखळी गैरकारणानें ओढल्याचे ६९१ प्रकार घडून आल्याचें समजतें. ह्या कारणामुळें रेल्वेचे ८४ तास व ५४ मिनिटें फुकट गेलीं. एक गाडी थांबल्यामुळें तिच्या मागोमाग येणाऱ्या दुसऱ्या गाड्यांच्या वेळाचा होणारा अपव्यय ह्यांत धरलेला नाहीं.

**डिझेल एंजिनांची आयात थांबवा**— पुणें येथें इंडियन डिझेल एंजिन मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन नांवाची संस्था नुकतीच स्थापन झाली आहे. ह्या संस्थेनें भारताच्या व्यापार-मंत्र्यांना तार करून डिझेल एंजिनांची आयात बंद करण्याची विनंति केली आहे. कारखान्यांत आणि एजंटांजवळ देशी एंजिनांचे सांठे पडून आहेत. सरकारनें स्वतःला लागणारीं एंजिनें देशी बनावटीची वापरावी, अशीहि विनंति करण्यांत आली आहे.

**हत्तीचा वैमानिक प्रवास**— लंडनहून 'राजा' नांवाच्या एका हत्तीला पॅन-अमेरिकन कंपनीनें विमानानें बॉस्टनला नेले. 'राजा'चें वजन १,२०० पौंड असून विमानानें ॲटलांटिक महासागर ओलांडणारा तो पहिलाच गजराज आहे. पूर्व बंगालच्या गव्हर्नरांनीं बॉस्टन येथील प्राणिसंग्रहालयाला तो नजर केला आहे.

**नागाचें भांडण सोडवूं नये**— कुंभकोणम् जवळील एका खेड्यांत एका नागाची आणि मुंगसाची प्राणांतिक झटापट चालू होती. ज्या माणसाच्या घरासमोर ही झुंज चालली होती त्यानें मध्यें पडून ती सोडविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळें नाग चवताळला आणि त्यानें मध्यस्थाला कडकडून चावा घेतला. वैद्यकीय उपायांचा उपयोग न होतां माणूस मरण पावला.

**बोलका नव्हे, मूक चित्रपट**— हॉलिवुडमधील एका निर्मात्यानें नाट्यप्रसंगांनीं व चित्त थरारून टाकणाऱ्या घटनांनीं भरलेला एक मूक चित्रपट काढण्याचें ठरविलें आहे. ह्या चित्रपटांत पार्श्वसंगीताचाच फक्त उपयोग करण्यांत येणार आहे. चित्रपटाची कथा नाट्यपूर्ण प्रसंगांनीं उलगडून दाखविण्यांत येणार आहे.

**मोटारींचा सांगाडा प्लॅस्टिकचा करणार**— ब्रिटन-मधील मोटारींच्या एका कारखान्यानें मोटारींचा दर्शनी भाग प्लॅस्टिकचा करण्याची तयारी दाखविली आहे. ह्यासंबंधीं कारखाना १५ वर्षें प्रयोग करीत आहे. कारखान्यानें अशी एक मोटार-बॉडी युद्धकालांत बनविली होती. ती मोटार ८५,००० मैल प्रवास केल्यावर अजूनहि चांगल्या स्थितींत आहे. कोणत्याहि हवेचा तिच्यावर परिणाम होत नाहीं.

**जगांतील तिसरें मोठें शहर**—टोकिओ शहराची लोकसंख्या आतां ६४,५०,००० इतकी झाली आहे. १९४८ पासून त्या शहराच्या लोकसंख्येंत चार लाखांची भर पडत असल्यानें तें आतां जगांत तिसऱ्या प्रतीचें शहर झालें आहे. जपानच्या साम्राज्यांतील जे लोक युद्धोत्तर परत आले, त्यांच्यामुळें लोकसंख्येंत अधिकच वाढ झाली.

**बेळगांव जिल्ह्यांतील पाटबंधारे**—बेळगांव जिल्ह्यांत पांच तळीं खोदण्याचें व ५ बंधारे बांधण्याचें काम पूर्ण झालें आहे. ह्या पाटबंधाऱ्यांच्या कामामुळें सुमारें ४,००० एकर जमीन पाटाच्या पाण्याखालीं भिजेल आणि १,००० टन अन्नधान्य पैदा होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. बेळगांव जिल्हा रूरल डेव्हलपमेंट बोर्डाच्या बैठकींत वरील माहिती सांगण्यांत आली.

**रशिआचें विमानांचें उत्पादन**—सोव्हिएट रशिआंत विमानांचे ८५ कारखाने आहेत. त्यांपैकीं १५ मोठे, ३० मध्यम आणि ४० लहान आहेत. अमेरिकेंतील विमानांच्या कारखान्यांच्या तुलनेनें हे कारखाने जास्त असले तरी त्यांतील बहुतेक छोटे आहेत. सर्व कारखान्यांत मिळून विमानांना लागणारे ५० ते ६० हजार सांगाडे दरमहा तयार होत असावेत.

**पवित्र पुस्तकें परत मिळालीं**—कराचींतील हिंदी हाय कमिशनरकडे पाकिस्तान सरकारनें ग्रंथसाहेब ह्या शिखांच्या पवित्र ग्रंथाच्या ३४० प्रती सुपूर्त केल्या आहेत. फाळणीच्या वेळीं हे ग्रंथ सिंधमधील शीख मंदिरांतून राहिलेले होते. ग्रंथांनीं भरलेल्या पेट्या मुंबईस पाठविण्यांत आल्या आहेत.

**सीलोनमधील घटस्फोटांच्या संख्येंत वाढ**—सीलोनमध्यें १९४८ सालीं ३८० घटस्फोट देण्यांत आले होते. १९५० सालीं घटस्फोटांची संख्या ४८७ झाली आहे. त्यांपैकीं ५० टक्के घटस्फोट कोलंबो शहरांत घेण्यांत आले.


थोड्या वेळांत
कमी खर्चात
काम करण्यासाठीं वापरा
हात पावडीं:
तीन प्रकारची. टिकाऊ लाकडाच्या दांड्याची. समतोल रचनेमुळे वापरण्यास सुलभ व सोयीस्कर. खोल पात्यांमुळे एका खेपेत बऱ्याच मालाची ने-आण करता येते.
हातोडे:
विशिष्ट पद्धतीनें ताव दिलेल्या पोलादापासून तयार केलेले विविध आकारांचे घण, पाथरवटांचे हातोडे, मोठमोठ्या मेखा व मोठे खिळे ठोकण्याचे हातोडे, तसेच लहान लहान कामाच्या हातोड्या.
टिकाव व कुदळ्या:
मुख्यत्वेंकरून चार प्रकारचे टिकाव व कुदळ्या. सडकबांधकामासाठीं व खाणींतील कामाकरितां विशेषेंकरून पसंत केल्या जातात. मुद्दाम मजबूत केलेल्या अति तीक्ष्ण टोकामुळें कार्यक्षमता वाढते.
मजबूत व टिकाऊ
टाटा ॲग्रिको
अवजारें
दी टाटा आयर्न ॲन्ड स्टील कं० लि०
सेल्स ऑफिस :
२३ बी, नेताजी सुभाष रोड, कलकत्ता
शाखा :—मुंबई, मद्रास, नागपुर, अहमदाबाद, कानपुर, सिकंदराबाद, विजयनगरम् कॅन्टोनमेंट, जलंदर कॅन्टोनमेंट.

# अर्थ

बुधवार, ता. २६ मार्च, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## मॅनेजिंग एजंटाबाबत नवा दृष्टिकोन

### डोळस मार्गदर्शनाखालीं, मर्यादित क्षेत्रांत कारभार-स्वातंत्र्य

मॅनेजिंग एजन्सीच्या पद्धतीमधील दोष टाळून ती राबविण्याकडे भाभा कमिटीनें काळजीपूर्वक लक्ष दिलें आहे. डायरेक्टरांच्या सर्वसाधारण अधिकाराखालीं व मार्गदर्शनाखाली मॅनेजिंग एजंटांनीं वागावें, परंतु त्यानंतर मात्र त्यांचे अधिकार व कर्तव्यें हीं स्पष्ट करून दिलीं जावींत म्हणजे त्यांना दिलेल्या क्षेत्रांत काम करण्यास पूर्ण मोकळीक सांपडावी, अशी कमिटीची योजना आहे. मॅनेजर्स नेमणें, डायरेक्टरांनीं घातलेल्या मर्यादेबाहेर नोकरवर्ग नेमणें, इत्यादि कांहीं बाबींस डायरेक्टरांची स्पष्ट मंजुरी मॅनेजिंग एजंटांनीं घेतली पाहिजे. डायरेक्टरांनीं कांहीं कामें पूर्णपणें मॅनेजिंग एजंटांकडे सोपविण्यास कमिटीचा विरोध आहे. थोडक्यांत म्हणजे मॅनेजिंग एजंटाच्या कृत्यांवर डायरेक्टरांचें लक्ष असलें पाहिजे व डायरेक्टरांनीं आपले अधिकार डोळसपणें वापरले पाहिजेत. कर्जें देण्याचे, करार करण्याचे, वगैरे सध्याचे मॅनेजिंग एजंटांचे अधिकार मर्यादित करण्यासाठीं कमिटीनें सूचना केल्या आहेत. त्याच व्यवस्थेखालील दुसऱ्या कंपनींत गुंतवणूक करण्याचे त्यांचे अधिकारहि छाटण्यांत आले आहेत. कंपनीचे वतीनें केलेल्या खरेद्यांवर मॅनेजिंग एजंटांना कमिशन मिळूं नये, परंतु कंपनीच्या मालविक्रीवर लहान कमिशन त्यांनीं आकारण्यास हरकत नाहीं. मात्र, हें कमिशन कंपनीनें स्पेशल ठरावानें मंजूर केलें पाहिजे. ज्या कंपनीची व्यवस्था पहावयाची, तिच्या कामासारखेंच इतर काम व त्याच्याशीं स्पर्धा करणारें काम मॅनेजिंग एजंटांना करतां येऊं नये, ह्याबाबत तरतुदी कमिटीनें आणखी आवळल्या आहेत.

### नेमणूक व हकालपट्टी

मॅनेजिंग एजन्सीचे ह्यापुढील करार १५ वर्षांपेक्षां ज्यास्त मुदतीचे असूं नयेत, अशी भाभा कमिटीची शिफारस आहे. ते आणखी १० वर्षांनीं वाढवितां यावेत परंतु पहिली मुदत संपण्यापूर्वीं २४ महिन्यांचे अवधींतच फेर-नेमणूक केली पाहिजे, त्यापूर्वीं नाहीं, अशी कमिटीची सूचना आहे. सध्यां अस्तित्वांत असलेल्या मॅनेजिंग एजन्सीच्या करारांची १५ ऑगस्ट, १९५९ पूर्वीं मुदत संपत असेल तर ठीकच. नाहीं तर त्यांची मुदत सक्तीनें त्या दिवशीं संपावी. नवीन कायदा अमलांत आल्यावरहि जुन्या करारांस थोडी मुदत मिळावी, म्हणून ही तारीख सुचविण्यांत आली आहे.

लबाडी अथवा अफरातफर करणाऱ्या मॅनेजिंग एजंटाला काढून टाकण्यास कंपनीचा ऑर्डिनरी ठराव पुरेसा असावा; इतर बाबतींत स्पेशल ठराव आवश्यक असावा. ज्या मॅनेजिंग एजंटाला नॉन-बेलेबल गुन्ह्याबाबत शिक्षा झाली असेल, त्याला काढून टाकण्यास ठरावाचीहि आवश्यकता नसावी. फर्म किंवा कंपनी हिचेकडे मॅनेजिंग एजन्सी असल्यास, त्यांचेसाठीं कांहीं सवलत सुचविलेली आहे.

### मॅनेजिंग एजन्सी हक्कांची खरेदी-विक्री

कंपनीनें ज्याला मॅनेजिंग एजंट म्हणून नेमलेला आहे, त्यानेंच कंपनीची व्यवस्था पहात रहावें हें रास्त आहे. मॅनेजिंग एजन्सी फर्ममध्यें किंवा कंपनींत एकाद्या तिऱ्हाइतानें निर्णायक अधिकार प्राप्त करून घेतले आहेत म्हणून त्याच्यामार्फत कंपनी चालविली जाणें इष्ट नाहीं. परंतु, त्याबरोबरच, मॅनेजिंग एजन्सींत दुसऱ्या एकाद्या चांगल्या माणसाचा (जो खरोखरच कंपनी अधिक चांगली चालवील) प्रवेश होण्यास अजिबात प्रतिबंध व्हावा, अशा जाचक अटी घालणेंहि इष्ट ठरणार नाहीं. मॅनेजिंग एजन्सी एकाचे हातांतून दुसऱ्याचे हातांत जाण्यावर बंधनें घालण्यांत अशा प्रकारच्या अडचणी आहेत. त्या लक्षांत घेऊनच कमिटीनें कांहीं बंधनें सुचविलीं आहेत. तीं बंधनें व कमिटीच्या रिपोर्टांत इतर ठिकाणीं सुचविलेल्या तरतुदी, ह्या सर्वांचा परिणाम इष्ट तो होऊन मॅनेजिंग एजन्सी हक्कांची बेमुर्वत खरेदी-विक्री होण्यावर आळा बसेल, अशी अपेक्षा आहे.

### वेतन

मॅनेजिंग एजंटाला दोन प्रकारचें वेतन मिळत असतें. त्यापैकीं कमिशन हें निव्वळ नफ्याच्या १२½% पेक्षा ज्यास्त असूं नये, अशी कमिटीची शिफारस आहे. अर्थात्, निव्वळ नफ्याची व्याख्या नीट ठरविणें क्रमप्राप्तच झालें व त्याप्रमाणें कमिटीनें व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. मॅनेजिंग एजंटांना ऑफिस अलावन्स मिळूं नये, परंतु ऑफिस ठेवण्यासाठीं होणारा केवळ प्रत्यक्ष खर्च कंपनीकडून त्यांना घेतां यावा, अशी कमिटीची सूचना आहे. पुरेसा नफा झाला नाहीं किंवा अजिबात नफा झाला नाहीं, तर कंपनी साधारण सभेंत वाजवी ठरवील तेवढीच रक्कम त्यास मिळावी आणि ही रक्कम वार्षिक ५०,००० रु. पेक्षा जास्त असूं नये; त्या व्यतिरिक्त अन्य मार्गानें त्यास अधिक वेतन मिळतां कामा नये. नवा कायदा झाल्यापासून दोन वर्षांचे आंत विद्यमान मॅनेजिंग एजंटांचें वेतन कमिटीनें सुचविलेल्या मर्यादेंत आणलें जावयाचें आहे.

### नुकसानभरपाई

मॅनेजिंग एजन्सी गेल्याबद्दल मॅनेजिंग एजंटांना पांच वर्षांतील त्यांच्या सरासरी कमाईच्या रकमे इतकी नुकसानभरपाई मिळूं शकेल. मॅनेजिंग एजंटांनीं आपण होऊन राजीनामा दिला, किंवा ज्या कारणांसाठीं त्यांना काढून टाकतां येईल अशा कारणांकरितां त्यांची मॅनेजिंग एजन्सी रद्द केली गेली किंवा मॅनेजिंग एजन्सी रद्द करण्याच्या ठरावास मॅनेजिंग एजंटांची पुष्टी असेल, तर मात्र त्यांना नुकसानभरपाई मिळणार नाहीं.

---

**रशिआचें कापसाचें उत्पादन**—कापसाचें उत्पादन वाढविण्यासाठीं झाडाला खत घालणारें एक यंत्र रशिअन शास्त्रज्ञांनीं शोधून काढल्याचें समजतें. हें यंत्र झाडाच्या दोन्हीं व जुळा सात इंच खोलपर्यंत खत घालूं शकतें. ह्या शोधामुळें रशिआंतील कापसाचें पीक १५ ते २० टक्के वाढेल, असा अंदाज करण्यांत आला आहे.

### दि युनायटेड कमर्शिअल बँक रिव्ह्यू

दि युनायटेड कमर्शिअल बँकेतर्फे वरील त्रैमासिक कलकत्ता येथून प्रसिद्ध होत असतें. त्याच्या चवथ्या वर्षाचा पहिला (फेब्रुवारीचा) अंक नुकताच आमचेकडे आला आहे. प्रस्तुत अंकांत गोल्ड मोहोर ह्या शीर्षकाखाली प्रथम नेहमीप्रमाणें संपादकीय स्फुटें देण्यांत आली आहेत. त्यांतील विषयांची झेप व विविधता एकदम लक्षांत येण्याजोगी आहेत. इजित, उत्पादनक्षमता, हे लेखहि माहितीपूर्ण व उद्बोधक आहेत. आकडेविषयक स्फुटें हीहि नित्याप्रमाणें चालू आर्थिक घडामोडींवर प्रकाश टाकणारीं असून, शेवटीं रंगांत छपाई व तक्ते ह्यांच्या सहाय्यानें पैशाचा पुरवठा, त्याचे व्याजाचे दर, शेड्यूल्ड बँका, परराष्ट्रीय व्यापार, घाऊक मालाचे व राहणीच्या खर्चाचे इंडेक्स नंबर्स, इत्यादींमधील चढउतार स्पष्ट करण्यांत आले आहेत. रिव्ह्यूच्या प्रत्येक अंकांत हीं सदरें असतात व संपादकीय स्फुटें व लेख हीहि असतात. युनायटेड कमर्शिअल बँकेचा हा उपक्रम फारच उपयुक्त व मार्गदर्शक आहे. बँका किंवा औद्योगिक कंपन्या ह्यांनीं पैसे मिळविण्याकडेच न पहाता त्यांचे हातून उच्च दर्जाची आर्थिक सेवा वाङ्मयीन होऊं शकते, ह्याचें हें उदाहरण आहे. श्री. जी. बी. पानसे, बी. ए. (ऑनर्स.) हे रिव्ह्यूचे संपादक आहेत.

---

### गिलिगन कॅटल ब्रीडिंग फार्मचें अपूर्व यश

दिल्ली येथें नुकत्याच (ता. २२ ते २७-२-५२ अखेर) भरलेल्या अखिल भारतीय पशुप्रदर्शनांत जळगांव शेतकी असोसिएशनच्या गिलिगन कॅटल ब्रीडिंग फार्मनें गायी, कालवडी व वळू अशीं आठ नेमाडी जनावरें पाठविलीं होतीं. प्रदर्शन कमिटीनें ठेवलेलीं तीन्हींहि पहिलीं बक्षिसें या जनावरांना मिळालीं. नेमाडी जातींत सर्वांत उत्तम जनावर ठरून सम्राट वळूनें ५०० रु. किंमतीचा चांदीचा चॅलेंज कप पटकाविला. रु. ४५० चें रोख बक्षीस मिळालें. चॅलेंज कप गेल्या नऊ वर्षांपासून दरसाल याच फार्मला मिळत आहे, ही आनंदाची गोष्ट आहे.

जनावरांच्या पैदाशीचें व सुधारणेचें कार्य असोसिएशन किती तत्परतेनें करीत आहे याची कल्पना वर्षानुवर्षें मिळत असलेल्या बक्षिसावरून येईल. या कामीं असोसिएशनला दरसाल आर्थिक तोटा सोसावा लागतो. सरकार व जनता सढळ हातानें आर्थिक सहाय्य करील, तर यापेक्षांहि अधिक वाढ व प्रगति फार्मच्या कामांत होईल यांत शंका नाहीं.

---

### हॅल्सबरीज लॉज ऑफ इंग्लंड

वरील ग्रंथाच्या नव्या आवृत्तीच्या प्रकाशनास येत्या नोव्हेंबरमध्यें प्रारंभ होईल. तिचे ४२ खंड छापून पुरे होण्यास १० वर्षें लागतील व त्यास ५ लक्ष पौंड खर्च येईल. त्यांत अडीच कोटी शब्द असतील. लॉर्ड चॅन्सेलर, लॉर्ड सायमंडस, ह्यांचें नांव ग्रंथाशीं संबंधित असलेल्या कायदेपंडितांच्या अग्रभागीं आहे. १९०७ सालीं ह्या ग्रंथाची पहिली आवृत्ति निघाली, त्यापूर्वीं समग्र इंग्लिश कायदा पद्धतशीरपणें एके ठिकाणीं सांपडण्याचें कांहींच साधन नव्हतें.

---

### रिझर्व्ह बँकेची नागपूर येथील इमारत

रिझर्व्ह बँकेनें नागपूर येथें स्वतःची इमारत बांधण्याचें ठरविलें आहे, त्यासाठी टेंडर्स मागविण्यांत आलीं आहेत. श्री. एल्. एम्. चिखले, चार्टर्ड आर्किटेक्ट, मद्रास, हे आर्किटक्ट आहेत.

## गो. स. पारखे औद्योगिक मान-पारितोषिक

### होतकरू कारखानदारांसाठी मराठा चेंबरची योजना

या वर्षींहि वरील पारितोषिक महाराष्ट्रांतील उद्योगधंद्यांच्या वाढीला प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त महाराष्ट्रांतील (मुंबई प्रांतांतील महाराष्ट्र, महाविदर्भ, मराठवाडा, गोमंतक व विलीन मराठी संस्थानें इ.) ज्या कारखानदारांनी नवीन वस्तु तयार करून बाजारपेठेंत यशस्वी रीतीनें खपविल्या आहेत, अशांपैकीं परीक्षण-समितीच्या शिफारशीनुसार मान्य झालेल्या नवीन वस्तूंबद्दल एका अगर अधिक कारखानदारांना देण्यांत यावयाचें आहे.

आलेल्या अर्जांचा विचार करून पारितोषिक कोणाला द्यावें हें ठरविण्याकरतां पुढील गृहस्थांची परीक्षण-समिती नेमण्यांत आली असून, त्यांनीं एकमतानें अगर बहुमतानें केलेल्या शिफारशींनुसार पारितोषिक देण्यांत येईल:-(१) श्री. गं. ल. नातू (२) श्री. दा. वा. पोतदार (३) श्री. शं. ल. किर्लोस्कर (४) श्री. ग. रा. साठे (५) श्री. म. स. पारखे. पारितोषिकाचा एकूण रक्कम रु. ३०० आहे. परीक्षण समितीला योग्य वाटल्यास सदर पारितोषिक जास्तींत जास्त तीन इच्छुकांत विभागून देण्याची शिफारस करतां येईल; परंतु पारितोषिकाची किमान रक्कम रु. १०० तरी राहील. पारितोषिकाची रक्कम दि. १६ जून १९५२ ला गोपाळराव पारखे स्मृतिदिनाच्या दिवशीं रोखीनें देण्यांत येईल व फ्रेम केलेलें चेंबरच्या अध्यक्षांच्या स्वाक्षरीचें प्रशस्तिपत्रहि पारितोषिक मिळविणाराला चेंबरतर्फे देण्यांत येईल. अर्ज करण्याची मुदत दिनांक ३० एप्रिल १९५१ ही आहे. त्या दिनांकापर्यंत कार्यवाह, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज्, मराठा चेंबर बिल्डिंग, ५८७/९, टिळक रोड, पुणें २ या पत्त्यावर अर्ज पोचले पाहिजेत.

---

### साखरेच्या धंद्यांतील अडचण

उत्तर प्रदेशांत साखरेच्या धंद्यांत मोठीच अडचण निर्माण झाली आहे. उसाचे शेतकरी ऊस विकण्याची घाई करीत आहेत. परंतु त्याची किंमत देण्यासाठी कित्येक कारखानदारांजवळ रोख रक्कम नाहीं. दर मणाचे १ रु. १२ आ. पैकीं १ रु. ४ आ. रोख देऊन बाकीचे ८ आ. मागाहून देण्यास सरकारनें कारखानदारांना परवानगी दिली आहे. कारखानदारांकडून वसूल करावयाची पट्टी भरण्यास मुदत दिली आहे. भारत सरकारनें एक्साइज ड्यूटीची वसुली थोडी पुढें ढकलावी अशी विनंति त्याला करण्यांत आली आहे. कारखानदारांनीं ऊस तात्काळ घेतला नाहीं तर तो शेतकरी जाळून टाकतील, अशी सरकारास भीति वाटत आहे.

---

### दर एकरीं ऊंस व साखर ज्यास्त काढणारास बक्षीस

१९५२-५३ मध्यें सर्वांत ज्यास्त एकरीं ऊंस व साखर काढणारास मुंबई सरकारनें २,००० रु. चें बक्षीस जाहीर केलें आहे. दर एकरीं किमान १२५ टन ऊंस निघाला पाहिजे व त्याचा किमान उतारा ११·५% पाहिजे. ह्या दोन्ही अटी पुऱ्या करतां आल्या नाहींत, तर दर एकरीं १२५ टन ऊंस काढणारास (साखरेचा उतारा कितीहि पडो) १,००० रु. चें बक्षीस मिळेल.

---

## अलिपूर येथील नवी टांकसाळ

भारताचे अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख यांच्या हस्तें भारत सरकारच्या आलिपूर ( कलकत्ता ) येथील नव्या टांकसाळीचें उद्घाटन झालें. या टांकसाळीच्या बांधकामासाठी २.२ कोटी रुपये खर्च आला असून दर दिवशीं दर आठ तासांच्यां कामाच्या पाळींत १२ लक्ष नाणीं पाडण्याची तिची उत्पादन शक्ती आहे. अलिपूर हें कलकत्त्याचें दक्षिणेकडील एक उपनगर असून त्याच्या सीमाभागावर बांधलेल्या या टांकसाळीनें ८७ एकर क्षेत्र व्यापलें आहे.

नव्या टांकसाळींत लहानशा पैपासून तों रुपयापर्यंतच्या सर्व नाण्यांचें उत्पादन करण्यांत येईल. भारतांत नव्या टांकसाळीची गरज कित्येक वर्षे भासत होती. परंतु गेल्या महायुद्धाच्या काळांत तिची निकड विशेषत्वानें भासूं लागली. पहिल्या महायुद्धांत आलेल्या अनुभवावरून दुसऱ्या महायुद्धांतहि नाण्यांची मागणी अतोनात वाढेल असें भारत सरकारला सन १९४० च्या सुरवातीस वाटूं लागलें. नव्या टांकसाळीची सध्याची जागा कलकत्ता बंदराच्या कमिशनरांकडून ताब्यांत घेऊन बांधकामास सुरवात करण्यांत आली. पण कलकत्त्यावर विमान हल्ले होण्याची सहज शक्यता लक्षांत घेऊन देशाच्या अंतस्थ भागांत एखाद्या सुरक्षित ठिकाणीं टांकसाळ हलविण्याचें भारत सरकारनें १९४२ मध्यें ठरविलें. त्यानुसार नव्या टांकसाळीच्या इमारतीचें बांधकाम मोडण्यांत येऊन तें सर्व सामान लाहोरजवळील भगवानपूर येथें हलविण्यांत आलें. त्या ठिकाणीं लहान प्रमाणावर एक टांकसाळ बांधण्यांत आली. युद्धकाळांत चार वर्षे या टांकसाळीचें काम चालू होतें.

परंतु, देशाच्या फाळणीमुळें भारत सरकारला लाहोर टांकसाळीस, त्यांतील यंत्रसामुग्रीसह, मुकावें लागलें. त्यामुळें सरकारला अलिपूर येथें टांकसाळीसाठी इमारतीपासून सर्वच गोष्टींना नव्यानें सुरवात करावी लागली. त्यावेळचे कलकत्ता टांकसाळीचे मिंट मास्टर मेजर लिम्बर्ले यांच्या देखरेखीखालीं १९४७ मध्यें बांधकामास आरंभ झाला. कलकत्ता टांकसाळीचे सध्याचे मिन्ट मास्टर मेजर जे. एच. पॉर्ट्रिज यांची अलिपूरच्या नव्या टांकसाळीचे पहिले मिन्ट मास्टर म्हणून नेमणूक झाली असून ते १९४८ पासून या बांधकामावर देखरेख करूं लागले. तेव्हांपासून बांधकामांत अेकसारखी प्रगति होत गेली आणि १९५१ च्या ऑगस्टमध्यें भारत सरकारनें, 'पश्चिम बंगालमधील २४ परगण्यांच्या जिल्ह्यांतील अलिपूर येथें भारत सरकारची टांकसाळ उघडण्यांत यावी ' अशा आशयाची आज्ञा काढली. अशा रीतीनें ही टांकसाळ अधिकृतपणें जन्मास आली.

### कलकत्ता येथील जुनी टांकसाळ

अलिपूर येथील टांकसाळींत संपूर्णपणें नाणीं पाडण्यास सुरुवात झाल्यावर कलकत्त्यांतील स्ट्रॅण्ड रोडवरील सध्यांची टांकसाळ बंद करण्यांत येईल. ही टांकसाळ गेलीं १२७ वर्षे चालू आहे. १ ऑगस्ट, १८२९ रोजीं येथें पहिलें नाणें पाडण्यांत आलें. त्या दिवसापासून या टांकसाळीचें भारतीय नाणे पद्धतींतील स्थान अभूतपूर्व झालें आहे.

---

**महात्माजींचें स्मारक**—एथिओपिआची राजधानी आदिस-अबाबा येथें महात्मा गांधींचें स्मारक म्हणून एक प्रसूतिगृह बांधण्यांत येणार आहे. स्मारकानिधीला मदत म्हणून भारत सरकारनें १०,००० रुपये देण्याचें ठरविलें आहे.


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)

शाखा : ३, ५, १० वर्षे सिल्व्हर
१ दादर ज्युबिली सर्टिफिकिटें
२ माहीम दर ९३-८, ८७-८, ७५ अनुक्रमें
३ बेळगांव हेड ऑफिस-गिरगांव, मुंबई
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.


---

**मध्यप्रदेशाला ट्रॅक्टर्स पाहिजेत**— मध्यप्रदेश सरकारनें नांगरणीसाठी ९० यंत्रचलित नांगर घेतले असून आणखी १०० नांगर घेण्याचा त्याचा विचार चालू आहे, असें समजतें. सरकारनें 'कॉंटिनेंटल' जातीच्या १० नांगरांची मागणी नोंदली आहे. त्यांची किंमत सुमारें ४,४५,००० रुपये होईल.

**पाकिस्तानांत टुथपेस्टचा कारखाना**— कराचींत टुथ पेस्ट तयार करण्याचा कारखाना उभारण्यांत आला आहे. ह्या कारखान्यांत रोज ४,००० ट्यूब्स तयार होऊं शकतील. कंपनीचें नांव 'प्रिमरोझ फॉर्मास्यूटिकल प्रॉडक्टस्' असें आहे. आपला माल कोणत्याहि परदेशी कंपनीच्या तोडीचा होईल, असें कंपनीच्या चालकांचें म्हणणें आहे.

---


# NOTICE

## THE BANK OF AUNDH, LIMITED.

NOTICE is hereby given that, the Fourteenth Ordinary General Meeting of the Share-holders of the Bank of Aundh Limited, will be held at the Registered Office of the Bank, 111-112. Sadashiv-Peth, Satara City, on Friday, the 11th April, 1952 at 4 P. M. (S. T.) to transact the following business :—

1. To receive and adopt the Balance Sheet, the Profit and Loss Account Statement, the Report of the Directors, and of the Auditors, for the year ended 31st December, 1951.
2.* To declare a Dividend.
3. To elect Directors in place of those retiring by rotation and who are eligible for re-election and to elect one Director co-opted under Article No. 68 who is eligible for re-election.
4. To appoint Auditors and to fix their remuneration.

By order of the Board.

SATARA, 10th March, 1952. B. W. GHAMANDE, Manager,

*N. B.*—The Share Transfer Books of the Bank will be closed from the 11th April, 1952 to 27th April, 1952, both days inclusive.

---

* The dividend when sanctioned will be payable on and after Monday the 28th April, 1952 and Dividend Warrants will be posted to the Registered addresses of the Share-Holders. *Change of Address, if any, should immediately be Communicated to the Bank.*

## प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँकेची वार्षिक सभा

### अध्यक्ष, श्री. म. रा. साठे, ह्यांचें भाषण

प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें, ह्या बँकेचे अध्यक्ष श्री. म. रा. साठे ह्यांनीं बँकेच्या १५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेंत केलेल्या भाषणांतील महत्त्वाचा भाग पुढें दिला आहे.

"अहवालाच्या वर्षांतील बँकेच्या दृष्टीनें महत्त्वाची घटना म्हणजे रिझर्व्ह बँकेनें व्याजाच्या दरांत केलेली वाढ. रिझर्व्ह बँकेनें आपला दर तीन टक्क्यावरून ३॥ टक्क्यावर नेला. त्यामुळें सरकारी रोख्यांच्या किंमतींत एकदम घट झाली. रिझर्व्ह बँकेनें सरकारी रोखे विकत न घेण्याची घोषणा केल्यामुळें रोख्यांच्या भावांतील घट एरव्हीं झाली असती त्यापेक्षा अधिक झाली. ही घोषणा करणें धंद्याच्या दृष्टीनें योग्य नव्हतें. नंतर ह्या धोरणांत थोडा बदल करण्यांत आला. परंतु तत्पूर्वी बँका, विमा-कंपन्या आणि पब्लिक ट्रस्ट ह्यांच्यावर अनिष्ट परिणाम झालाच. ह्या धोरणाचा हेतू रहाणीचा खर्च खालीं आणण्याचा आहे असें म्हणतात. पण प्रत्यक्षांत उलटे परिणाम घडून येण्याचा संभव आहे. व्यापाऱ्यांनीं आपली खरेदी बंद केल्यानें जिनसांचा सांठा वाढत आहे आणि त्यामुळें उत्पादनही घटण्याचा संभव आहे. त्यामुळें बेकारी वाढून लोकांची क्रय शक्ति घटेल. कच्च्या मालाच्या किंमती उतरल्या तरच गिऱ्हाइकांना स्वस्ताईच्या दरानें माल देता येईल. त्याबरोबर उत्पादनहि वाढलें पाहिजेच. परंतु सध्याच्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीनें कच्च्या मालाच्या किंमती वाढत आहेत. त्यांतच अधिक वेतन आणि तेही दर कामगारामागे अधिक उत्पादन न होता देण्याचें सध्याचें धोरण आहे. अशा परिस्थितींत उत्पादकानें नफा न घेतां काम करण्याचें ठरविलें तरी सुद्धा उपभोग्य वस्तू स्वस्त होणार नाहींत.

"व्यापारी वर्गानें सांठेबाजी केल्यानें किंमती वाढल्या आहेत. तेव्हां साठेबाजांची शक्ति कमी केली म्हणजे व्यापार मोकळा होऊन मालाची उलाढाल वाढेल व किंमती कमी होतील अशी सरकारची अपेक्षा आहे. पण हें अर्धसत्य आहे. किंमती खालीं आणण्यासाठी साठेबाजीला आळा घालणें योग्य झालें असतें. युद्धकालांत ज्याप्रमाणें साठेबाजीला बंदी करण्यांत आली होती तशी आतांही करतां येईल. कायदे करतां येतील आणि बँकांनीं दिलेल्या कर्जांवर नजर ठेवतां आली असती. अधिकांत अधिक उत्पादन आणि कमीत कमी उत्पादन-खर्च हें ध्येय गाठावयाचें असेल तर उद्योगधंद्यांना यंत्रसामुग्री अद्यावत ठेवण्यासाठी लागणारा पैसा मिळण्याची सोय करणें आणि कच्चा माल हाताशीं ठेवणें येवढाच मार्ग आहे. देशांत बिल मार्केटला उत्तेजन देण्याचें रिझर्व्ह बँकेचें धोरण स्वागतार्ह आहे. परंतु बिल मार्केटचा फायदा फक्त बड्या बँकांना घेतां येईल इतकी बंधनें त्यासंबंधीं घालण्यांत आलीं आहेत. मोठ्या बँकांनीं लहान बँकांना बिल मार्केटच्या व्यवहारांत सवलतीनें वागवावे अशी माझी सूचना आहे. त्यांनीं सहकार्य न केल्यास ह्या संबंधींच्या योजनांत बदल करून लहान बँकांना अगर बँकांच्या गटांना ह्या योजनेचा फायदा मिळण्याची व्यवस्था रिझर्व्ह बँकेनें करावी.

"सध्या आपला देश टंचाईच्या व हालअपेष्टांच्या काळांतून जात आहे. परंतु अशा काळांतहि आशेचे किरण दिसत आहेत. भारताच्या पंचवार्षिक कार्यक्रमाला जागतिक बँकेकडून मदत मिळण्याचा संभव दिसत आहे. त्याचप्रमाणें इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनकडून भारतीय उद्योगधंद्यांना मदत मिळेल असें दिसतें. धंद्यांच्या स्थैर्याची शंभर टक्के खात्री असल्याशिवाय मदत न देण्याचें धोरण कॉर्पोरेशननें आतां बदललेलें दिसतें. तथापि, तरी सुद्धा, उद्योगधंद्यांच्या विकासांत बँकिंगच्या स्थानाकडे दुर्लक्ष करतां येणार नाहीं. म्हणून रिझर्व्ह बँकेनें बँकांवर घातलेलीं नियंत्रणें ढिलीं केल्याशिवाय देशाच्या औद्योगिक परिस्थितींत सुधारणा होणार नाहीं. सामान्य जनतेनेही पैशाची बचत गुंतविण्याच्या आपल्या कल्पनांत बदल केला पाहिजे. हिंदुस्थानांत अनुत्पादक रीतीनें बचत गुंतविण्याची पद्धत आहे, असें म्हणतात. आणि तें कांहींसें खरेंही आहे. सोन्या-चांदींत बचत गुंतविण्यापेक्षां सरकारी कर्जें बँका, विमा कंपन्या, अगर औद्योगिक कंपन्यांचे भाग ह्यांच्यांत ती गुंतविणें अधिक चांगलें. कांहीं अर्थशास्त्रज्ञ व पुढारी असें म्हणतात कीं भांडवल संप करीत आहे. पण मला तसें वाटत नाहीं. खरा भांडवलदार आपलें भांडवल अनुत्पादक आणि बिन-किफायतशीर मार्गानें कधींही अडकवून ठेवणार नाहीं. खरी परिस्थिति अशी आहे कीं भांडवल उद्योगधंद्यांतून निघून शेतीकडे जात आहे. पैसा शहरें सोडून ग्रामीण भागांत जात आहे. हा पैसा एकत्रित करून आधुनिक उद्योगधंद्यांत व शेतींत गुंतविला जाणें जरूर आहे. ग्रामीण भागांतील लोकांत बँकिंगची संवय उत्पन्न केली तरच ही गोष्ट शक्य होईल. इकडे लक्ष न देतां सरकार जर उद्योगधंद्यांवर अधिकाधिक कर बसवूं लागेल तर भांडवल घडणीचा झराच आटून जाईल. कराचा बोजा वाढला तर भांडवलाची घडण आणि औद्योगिक उत्पादन दोन्हीं कमी होतात असा अनुभव आहे. नव्या सरकारला ह्या सिद्ध झालेल्या गोष्टीकडे दुर्लक्ष करणें परवडणार नाहीं."

---

## फेब्रुवारी १९५२ मधील मालाच्या घाऊक किंमतींतील चढउतार

अधिकृत निर्देशांकाच्या परिमाणानुसार फेब्रुवारी १९५२ मध्यें निरनिराळ्या मालाच्या घाऊक किंमतींच्या निर्देशांकांत ( मूळ प्रमाण: ऑगस्ट १९३९ ला संपलेलें वर्ष १०० ) आणखी ३·४ टक्क्यांनीं घट होऊन तो ४१५·८ ( दुरुस्त ) झाला. त्यामागील महिन्यांत तो ४३०·३ होता. फेब्रुवारी १९५१ मधील ४२३·४ या निर्देशकांशीं तुलना करतां तो १·८ टक्क्यानें कमी आहे. पुनर्विलोकनाच्या या महिन्यांत सर्व गटांच्या निर्देशांकांत घट झाली आहे. 'अन्नपदार्थ' या गटाचा निर्देशांक ४·५ टक्क्यांनीं उतरून ३७५·४ ( दुरुस्त ) असा झाला; 'औद्योगिक कच्चा माल' या गटाच्या निर्देशांकांत ६·१ टक्क्यांची घट होऊन तो ५४५·४ वर आला तर 'अर्ध-पक्का माल,' 'पक्का माल' व 'संकीर्ण वस्तू' या गटांचे निर्देशांक अनुक्रमें १·४, १·७ व ३·४ टक्क्यांनीं उतरून ते अनुक्रमें ३६४·२, ३९४·१ व ७०९·८ ( दुरुस्त ) वर आले.

---

**कोंबड्यांची झुंज लावण्याची करमणूक**— कोंबड्यांची झुंज लावून करमणूक करून घेण्याच्या प्रकारास इंग्लंडमध्यें ११७ वर्षांपूर्वींच बंदी करण्यांत आली आहे. तथापि, अजूनहि अशा झुंजी लावण्यांत येतात आणि कोंबड्यांवर पैसेहि लावण्यांत येतात. अर्थात्, हा सर्व प्रकार गुप्त रीतीनें चालतो. खेळाची जागा अगदीं अखेरच्या क्षणाला सभासदांना गुपचुप कळविण्यांत येते. मूळची बंदी प्राणिक्लेश कायद्यान्वयें करण्यांत आली होती.

## काश्मीरमधील ग्रामोद्योग

१९४७ सालीं काश्मीरवर टोळीवाल्यांचा हल्ला झाल्यापासन तेथील ग्रामोद्योग घसरगुंडीला लागले होते, परंतु आतां त्यांची परिस्थिति पुन्हा सुधारूं लागली आहे. काश्मीरमधील ग्रामोद्योगांपासून लोकांना दरवर्षीं सुमारें २ कोटी रुपयांची प्राप्ति होत असते. काश्मीरमधील छोटे छोटे उद्योगधंदे आणि कलात्मक हस्तव्यवसाय ह्यांना सरकारकडून उत्तेजन देण्यांत येत असतें. त्यांची सहकारी तत्त्वावर संघटना करण्यासाठी मुक्त हस्तानें कर्जें देण्यांत येतात अगर इतर द्रव्यविषयक मदत केली जाते. काश्मीरमधील कलात्मक वस्तूंच्या विक्रीसाठी काश्मीर सरकारनें भारतांत पुष्कळ ठिकाणीं आपलीं दुकानें काढलेलीं आहेत. ह्या दुकानांतर्फे १९५१ सालांत सुमारे २५ लाख रुपयांचा माल विकला गेला. ग्रामोद्योगांचा माल परदेशांत पाठविण्याकडेहि सरकार लक्ष पुरवीत आहे. ही निर्यात करण्यासाठीं भारतीय सरकारनें काश्मीर सरकारला गेल्या वर्षीं ५०,००० रुपयांची मदत दिली होती. १९५१ मध्यें ९ लाख रुपये किंमतीचा माल परदेशांत पाठविण्यांत आला. उत्पादनाच्या पद्धतींत सुधारणा करण्याचे प्रयत्नहि सरकारकडून होत आहेत. मालाचा दर्जा एकसारखा राखण्याचे प्रयत्न करण्यांत येत असून त्यांना थोडें-बहुत यशहि येत आहे. भारतीय सरकारनें काश्मीर सरकारला नुकतीच आणखी ४०,००० रुपयांची मदत दिली आहे. कलाकुसरीच्या कामाला लागणारें लाकूड त्यासाठीं योग्य करण्याचा एक कारखाना ह्या निधींतून काढण्यांत येणार आहे. त्याशिवाय रेशमी व सुती कापडावर नक्षी काढणें आणि पक्क्या रंगांचें कापड तयार करणें, इत्यादि धंद्यांवरहि वरील रकमेंतून खर्च करण्यांत येणार आहे.

---

## १९५१ मधील जगांतील जहाजांच्या टनेजची वाढ

१९५२ च्या लॉइड्स रजिस्टरप्रमाणें १९५१ या वर्षी २५ लक्ष ६२ हजार टन ग्रोस वजनाच्या जहाजांची वाढ झाली. जुलै १९५१ मध्यें जगांतील एकूण जहाजांचें टनेज ८ कोटी ७२ लक्ष ४५ हजार टन होतें. यापैकीं हिंदच्या मालकीचीं जहाजें फक्त ३ लक्ष ८१ हजार टन किंवा जागतिक टनेजच्या अर्ध्या टक्क्यांनीं कमी होतीं. या एका वर्षांत हिंदनें फक्त २१ हजार टनांचीं नवीन जहाजें बांधलीं. १९५०-५१ या एका वर्षांत जर्मनीची वाढ ४ लक्ष ६० हजार टनांपासून १० लक्ष २१ हजार टनांपर्यंत झाली, नॉर्वे व इटली यांचीहि वाढ अनुक्रमें ५४ लक्ष ५६ हजार टनांपासून ५८ लक्ष १६ हजार टनांपर्यंत व २५ लक्ष ८० हजार टनांपासून २९ लक्ष १७ हजार टनांपर्यंत झाली. ग्रेट-ब्रिटन व उत्तर आयर्लंड यांच्या जहाजांचें टनेज १ कोटी ८२ लक्ष १९ हजारांपासून १ कोटी ८५ लक्ष ५० हजारांपर्यंत वाढलें. जपाननेंहि आपल्या जहाजांत १८ लक्ष ७१ हजार टनांपासून २१ लक्ष ८२ हजार टनांपर्यंत वाढ केली. अमेरिकेच्या टनेजमध्यें मात्र थोडीशी घटच झाली. ही घट २ कोटी ७१ लक्ष १३ हजारांपासून २ कोटी ७३ लक्ष २१ हजारांपर्यंत झाली. नवीन बांधल्या गेलेल्या जहाजांत ८ ते १० हजार टनांच्या व १० ते १५ हजार टनांच्या जहाजांचें प्रमाण जास्त दिसतें. परंतु दुसऱ्या महायुद्धाच्या कालांत ६ ते ८ हजार टन वजनाचीं जहाजें जास्त बांधलीं गेलीं.

---

दि
युनायटेड कमर्शिअल बँक लि.
कलकत्ता.

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ | कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ | कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ | कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६७½ | लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :
जी. डी. बिर्ला (चेअरमन)
ईश्वरीप्रसाद गोएंका, व्हाइस चेअरमन — रमणलाल जी. सरय्या, व्हाइस चेअरमन
अनंत चरण लॉ — महादेव एल. डहाणूकर
बैजनाथ जालन — मदनमोहन आर. रुइया
गोविंदलाल बंगूर — मोहनलाल एल. शहा
पी. डी. हिमतसिंगका — मोतीलाल तापुरिया
रामेश्वरलाल नोपानी — नवीनचंद्र मफतलाल
: जनरल मॅनेजर :
बी. टी. ठाकूर
भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सर्व जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

ठेवी स्वीकारण्यांत येतात
ठेवीवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.
पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड.
शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,
१७२, गिरगांव रोड, मुंबई ४
टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay

## बँक ऑफ सिटीझन्स लि.ची वार्षिक सभा

दि बँक ऑफ सिटिझन्स लि. बेळगांव, या बँकेच्या भागीदारांची वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेच्या मुख्य कचेरींत (१५१४, मारुति गल्ली, बेळगांव येथें) रविवार ता. ९ मार्च १९५२ रोजी सायंकाळीं ४ वाजतां श्री. बंदूकवाला शेटजी यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. सभेस सुमारें ५० सभासद हजर होते. बँकेचे प्रमुख श्री. जी. डी. सराफ ह्यांनीं बँकेच्या प्रगतीची माहिती सांगितल्यावर नफातोटापत्रक व ताळेबंद, डायरेक्टर्स निवडणूक, वगैरे सर्व ठराव एकमतानें पास झाले. त्यानंतर बँकेचे डायरेक्टर्स श्री. उमरगोळ व श्री. होसमनी यांचीं भाषणें झालीं. त्याच दिवशीं बोर्ड ऑफ डायरेक्टर्स यांची सभा भरून श्रीयुत जी. डी. सराफ हे बोर्डाचे चेअरमन म्हणून एकमतानें निवडून आले.

### श्री. सराफ ह्यांचें भाषण

"बँक स्थापन होऊन आज १५ वर्षें झालीं. सुरवातीला बँकेचें पेड-अप कॅपिटल रु. १०,८००, ठेवी रु. ५१,७०० व खेळतें भांडवल रु. ६२,७००, होतें. आज बँकेचें पेड-अप कॅपिटल रु. ३,५०,०००, रिझर्व्ह फंड रु. १,१६,०००, एकूण ठेवी रु. २६,४०,००० व खेळतें भांडवल रु. ३७,४७,००० असें आहे. मध्यंतरीं या बँकेला जो त्रास सोसावा लागला तो जर झाला नसता तर आज ही बँक यापेक्षां जास्त प्रगतिपर झाली असती.

"जीवनमानाचें प्रमाण कल्पनेपेक्षाहि वाढल्यामुळें गेल्या वर्षी बँकेच्या सर्व नोकरवर्गाला पगारवाढ केल्यामुळें या वर्षी रु. १०,००० जादा पगारवाढ झाली आहे. बँकेच्या पैशाच्या सुरक्षिततेसाठीं विमा उतरविल्यामुळें रु. ४,००० वार्षिक खर्च वाढला आहे. हे सर्व खर्च वजा जाऊनहि भागीदारांना १९५१ अखेर करमाफ ४ टक्के डिव्हिडंड देण्याचे बँकेच्या डायरेक्टर बोर्डानें ठरविलें आहे.

"बँकिंग कंपनीज ॲक्ट १९४९ च्या कायद्यानें प्रत्येक बँकेला ठेवींच्या १/५ इतकी रक्कम रोखींत ठेविली पाहिजे. त्याप्रमाणें या बँकेनें ठराविक रकमेपेक्षाहि जास्त रक्कम रोख ठेविली आहे.

"आर्थिक घडामोडींमुळें सर्व वस्तूंचे व धान्याचे भाव फार उतरले आहेत व उतरत आहेत. नाणेबाजारांत पैशांची तीव्र टंचाई दिसून येऊं लागली आहे. अशा परिस्थितींतहि ही बँक व्यापाऱ्यांना योग्य त्या सवलती देऊन त्यांना मदत व मार्गदर्शन करील. लवकरच ही बँक शेड्यूल्ड बँक होऊन उत्तरोत्तर जास्त प्रगतिपर होईल अशी आशा आहे."

---

**मॉस्कोची आर्थिक परिषद्**—मॉस्को येथें एप्रिलमध्यें भरणाऱ्या आर्थिक परिषदेस हजर रहाण्यासाठीं २५ सभासदांचें एक भारतीय प्रतिनिधीमंडळ मार्चच्या शेवटच्या आठवड्यांत निघणार आहे. ह्या मंडळांत ५ अर्थशास्त्रज्ञ, १५ उद्योगपती, २ मजूर पुढारी आणि शेतकरी १ पुढारी आहे.

**भारताला आणखी मदत मिळणार**—जागतिक बँकेचे एक कार्यकारी डायरेक्टर श्री. बी. के. नेहरू ह्यांनीं नुकतेंच असें सांगितलें कीं, भारताच्या पंचवार्षिक योजनेला बँकेकडून आणखी मदत मिळण्याची शक्यता आहे. भारताची बँकेजवळील पत बरीच उंच दर्जाची आहे, असेंहि ते म्हणाले.

## आजच्या मंदीची मीमांसा

(डॉ. जॉन मथाई)

जागतिक किंमती हळूहळू घटत चालल्या आहेत, परंतु ही गोष्ट म्हणजे आर्थिक किंवा व्यापारी क्षेत्रांतील आपत्ति नव्हे. आजची मंदी ही अमेरिकेकडून कमी प्रमाणांत होणारी सांठेबाजी, आंतरराष्ट्रीय प्रयत्नांनीं जागतिक कच्च्या मालाची समप्रमाणांत वांटणी करण्याचें कार्य, वाढतें नागरी व लष्करी उत्पादन, पैशाची महर्गता व पतीनें चालणाऱ्या व्यवहारांवर नियंत्रण या सर्व गोष्टींचा समुच्चयानें झालेला परिणाम आहे. गेल्या कांहीं दिवसांत आवश्यक असा चलनसंकोच दिसून आला आहे. पश्चिमात्य देशांनीं ही गोष्ट सहज रीतीनें सहन केली आहे. परंतु हिंदमध्यें ही एक आपत्ति समजली जाते. कच्च्या मालाच्या उत्पादनांत हिंदला प्रमुख स्थान असल्यामुळें या मालाच्या किंमतींची वाढ किंवा मालाच्या मागणीची मंदी यांचे त्वरित परिणाम येथील अर्थव्यवहारावर होतात. हिंदचा व्यापारी वर्ग औद्योगिक प्रगति झालेल्या इतर देशांच्या मानानें त्वरित फळ मिळावें अशी अपेक्षा करितो. मॅनेजिंग एजन्सी पद्धतीचाहि हा कांहींसा परिणाम असावा. योग्य पद्धतीचा व्यापार व सट्टेबाजी यांत येथें योग्य तो फरक राहात नाहीं व राहाणीचें मान अगदीं हलक्या दर्जाचें असल्यामुळें, किंमती उतरल्याचे परिणाम त्वरित दिसून येतात.

आज सुरू झालेली ही मंदीची लाट फार दिवस टिकणार नाहीं, व तिनें आपला उच्चांक गांठला आहे. लौकरच किंमती स्थिर होऊन थोड्या प्रमाणांत सुधारतीलहि. आजच्या या मंदीच्या लाटेमुळें चलनवाढ कायमची थांबली आहे असें मानण्याचें मात्र कारण नाहीं. कारण या मंदींत आलेल्या अनुभवामुळें उत्कट स्वरूपाच्या चुकीच्या कल्पनांना जागा मिळाली आहे. सट्टेबाजी व वाजवीपेक्षां जास्त व्यापार करणें हीं कारणें असलीं तरी कांहीं ठिकाणीं सचोटीनें व्यवहार करणाऱ्या व्यापाऱ्यांवर, भांडवल गुंतविणारांवर व उद्योगधंद्यांत असलेल्या व्यक्तींवरहि परिणाम झालेला दिसतो. सध्यां किंमतींत झालेल्या घटीमुळें सामान्य जनतेच्या जीवनावर फारसा अनुकूल परिणाम होईल असें नाहीं, कारण अन्नधान्याच्या किंमती वाढणार आहेत व उतरलेल्या किंमती अगदीं किरकोळ बाबतींतल्या असून मध्यमवर्गीय व्यापारी व भांडवल गुंतविणारे यांचा जास्त तोटा झालेला आहे. हिंदमधील नाणेबाजार सर्व जगांत नाजूक आहे व आज लागलेल्या तडाख्यामुळें खाजगी उद्योगधंद्यांत भांडवल गुंतविण्याच्या दृष्टीनें परिस्थिति असमाधानकारक राहील. कस्टमचें उत्पन्न व प्राप्तीकर यांमध्यें तूट येण्याचा संभव आहे. आजच्या परिस्थितीवर पुढील चार प्रकारचे उपाय शक्य दिसतात. (१) निर्यात जकातींचें प्रमाण उतरविणें. यामुळें अंतर्गत विक्रीचें दडपण कमी होईल. (२) निर्यातीवरचीं बंधनें, निर्यातीचें प्रमाण व देश या दोहोंच्या दृष्टीनें कमी करणें. (३) व्यापारी बिलांच्या देवघेवीच्या बाबतींत अटी सैल करून खुल्या बाजाराला शक्य तो अवसर देणें. (४) करांचें प्रमाण कमी करून सरकारी खर्चांत शक्य असेल तो काटकसर साधणें. आजची मंदी म्हणजे कायमचा चलनसंकोच होऊन त्यांतून उद्भवलेली सुस्थितीची लाट नव्हे; तर इतर कारणांमुळें निर्माण झालेल्या परिस्थितीचा हा परिणाम आहे.

मुंबई येथील भाषण, १०-३-५२.

---

८७३ पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.